# WINRO COMMERCIAL (INDIA) LTD.

Regd. Off.: 209-210, Arcadia Building, 2nd Floor, 195, Nariman Point, Mumbai - 400 021.
Tel : 4019 8600 Fax : 4019 8650 E-mail : winro.investor@gcvl.in Web : www.winrocommercial.com
CIN : L51226MH1983PLC165499

**Date: 05th December, 2019**

To
Corporate Relationship Department
**Bombay Stock Exchange Limited**
P. J. Towers, 1st Floor,
Dalal Street,
Mumbai - 400001

**Ref: Scrip code: 512022**
**Regulation 47 and other applicable regulations, if any, of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations")**

Dear Sir,

**Sub: Newspaper Publication of Notice of Board Meeting to be held on 12th December, 2019.**


With reference to above, please note that the notice of Board Meeting of Winro Commercial (India) Limited scheduled to be held on Thursday, 12th December, 2019 for approval of Un-Audited Financial Results for the quarter and half year ended on 30th September, 2019 has been published on 5th December, 2019 in Financial Express in English Language to be circulating in whole of India and Global Times newspaper in Marathi language to be circulating in Mumbai.

Enclosed herewith please find copy of the newspapers cuttings.

This is for your information and records.

Yours faithfully,

**FOR WINRO COMMERCIAL (INDIA) LIMITED**




**URJA KARIA**
**COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER**

Encl.: As above.

# Want to help countries emulate India model of transitioning from recipient to donor: US

**LALIT K JHA**
Washington, December 4

**CHALLENGED BY THE** coercive Chinese overseas aid, the US has said that it wants to help other countries follow the India model of transitioning from being an aid recipient to a partner and then to a donor.

"Our goal is to help countries move from being recipients to partners, to fellow donors. That's what we want. We want to build that coalition of the willing for the West, for the United States," USAID administrator Mark Green said in his address to the Professional Services Council's 7th Annual Development Conference.

"We want to enhance the ability of countries like India to move from when they received sacks of food from us, to a place where they are now the fifth-largest donor to Afghanistan in financing key development there. Not every country is India. Not every country has advanced that far on their journey," Green said.

— PTI


**WINRO COMMERCIAL (INDIA) LIMITED**

**Regd. Office:** 209-210, Arcadia Building, 2nd Floor, 195, Nariman Point, Mumbai - 400021.
**Telephone:** 40198600, **Fax:** 40198650,
**Website:** www.winrocommercial.com,
**Email Id:** winro.investor@gcvl.in,
**CIN:** L51226MH1983PLC165499

**NOTICE**

Notice is hereby given that pursuant to Regulation 29 and 47 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Thursday, 12th December, 2019 at 3.30 P.M. inter alia to consider and approve the Un-Audited Financial Results for the quarter and half year ended on 30th September, 2019.

Further, the Trading Window for dealing in the securities of the Company has been kept closed for all Directors, designated persons and their immediate relatives of the Company from 30th September, 2019 till 48 hours from the declaration of the Un-Audited financial results for the quarter and half year ended on 30th September, 2019 as approved by the Board of Directors on 12th December, 2019. The Communication has been sent to the Directors, designated persons and their immediate relatives of the Company.

This information is also available on the website of the company at **www.winrocommercial.com** and on the website of BSE Ltd at **www.bseindia.com**

For **Winro Commercial (India) Limited**
Sd/-
**Urja Karia**
**Company Secretary**
**& Compliance Officer**

**Place : Mumbai**
**Date : 04.12.2019**



# Tejas Networks Limited

**Corporate Identity Number : L72900KA2000PLC026980**

**Registered and Corporate Office: J.P. Software Park, Plot No. 25, Sy. No. 13, 14, 17 & 18, Konnapana Agrahara Village, Begur Hobli, Bengaluru-560 100, Karnataka Tel. : +91 80 4179 4600 Fax : +91 80 2852 0201**
**E-mail : corporate@tejasnetworks.com Website : www.tejasnetworks.com**

## NOTICE

Notice is hereby given pursuant to the provisions of Section 110 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013 read with Companies (Management and Administration) Rules, 2014 (including any statutory modification(s) or re-enactment(s) thereof for the time being in force), SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015 and such other applicable laws and regulations, that the approval of shareholders / members of Tejas Networks Limited (hereinafter, the "Company") is being sought for the following business by way of Postal Ballot which includes voting by electronics means :

- **Re-appointment of V Balakrishnan (DIN 02825465), as a Non-Executive Chairman and Independent Director.**

The Postal Ballot Notice and Form, along with the other relevant documents, are sent to all the shareholders whose names appear in the Register of Members/ Beneficial Owners and as received from National Securities Depository Limited ("NSDL") and Central Depository Services (India) Limited as on November 22, 2019 ("Cut-off date"). The voting rights shall be reckoned on the paid-up value of the shares registered in the name of the member as on the cut-off date (i.e) Friday, November 22, 2019.

The Company as on Tuesday, December 3, 2019 has completed sending the Notice of the Postal Ballot along with Postal Ballot Form (including instructions to the Postal Ballot Form) by way of e-mail through National Securities Depository Limited (NSDL) along with the details of the login ID and password to the shareholders/ members who have registered their e-mail IDs with the depositories or with the Company. The physical copies of the Postal Ballot Notice and Postal Ballot Form (including instructions to the Postal Ballot Form) and a self-addressed business envelope (for which postage charges will be paid by the Company) were dispatched to the members/ shareholders who have not registered their e-mail IDs with the depositories or with the Company.

The Board has appointed Mr. C Dwarakanath, Company Secretary in Practice (FCS- 7723 and CP No: 4847) & IP failing which Mr.Ananta Deshpande, Company Secretary in Practice (ACS – 24319 and CP No.20322) as the scrutinizer ("Scrutinizer") for conducting the Postal Ballot / e-voting process. Mr. C Dwarakanath, Company Secretary in Practice (FCS- 7723 and CP No: 4847) & IP has consented for the said appointment to act as scrutinizer.

The date of commencement of voting through Postal Ballot and E-voting is Thursday, December 5, 2019 at 9.00 A.M. (IST) and ends on Friday, January 3, 2020 at 5.00 P.M. (IST). The members can opt for only one mode of voting i.eeither by physical ballot or e-voting. In cases where members cast their votes through both modes, voting cast through e-voting shall be treated as valid and votes cast through the physical Postal Ballot Forms will be treated as invalid.

The shareholders/ members who have not received the postal ballot form may write to Company's Registrar and Share Transfer Agent, Link Intime India Private Limited ("RTA") C-101, 247 Park, L.B.S. Marg, Vikhroli (W), Mumbai-400 083 or the Company at its Registered Office at Plot No.: 25, Electronics City, Hosur Road, Bangalore - 560100 and obtain the duplicate thereof or can download the Postal Ballot Form from the Company's web-site at https://www.tejasnetworks.com/postal-ballot.php.

The Postal Ballot Form duly completed and signed by the member(s)/ shareholder(s) should reach the Scrutinizer not later than Friday, January 3, 2020 by 5.00 P.M (IST). Any Postal Ballot received after Friday, January 3, 2020 by 5.00 P.M. (IST) shall be invalid and voting by Postal Ballot will not be allowed beyond the said date and time. The Voting by electronic means shall not be allowed beyond 5.00 P.M (IST) on Friday, January 3, 2020.

The Notice of the Postal Ballot along with Postal Ballot Form (including instructions to the Postal Ballot Form) will also be placed on the website of the Company https://www.tejasnetworks.com/postal-ballot.php. and on the website of NSDL at https://www.nsdl.co.in. The member (s)/ shareholder(s) can also contact Mr. Manohar Shirwadkar, Senior Associate, Link Intime India Private Limited E-mail ID: Manohar.shirwadkar@linkintime.com.in, Tel.No: +91 22 49186200 incase of any requirement for the Postal Ballot.

The Scrutinizer will submit his report to the Chairman of the Board/ any Director/ Company Secretary after the completion of the scrutiny and the result of the voting by Postal Ballot will be announced on or before Sunday, January 5, 2020 through the website of the Company https://www.tejasnetworks.com/postal-ballot.php. and by way of intimation to the Stock Exchanges on which the Company is listed. The Contact details of the person responsible to address the queries/ grievances connected with the voting by Postal Ballot including voting by electronics means, if any:

N R Ravikrishnan, General Counsel, Chief Compliance Officer and Company Secretary, Tejas Networks Limited, Plot No.: 25, Electronic City, Hosur Road, Bangalore - 560100, Tel: +91 80 4179 4600, Fax: +91 80 2852 0201, Email: corporate@tejasnetworks.com (or) Link Intime India Private Limited, C-101, 1st Floor, 247 Park, L.B.S. Marg, Vikhroli (West), Mumbai - 400083, Maharashtra, India, Website: www.linkintime.co.in, E-mail: rnt.helpdesk@linkintime.co.in

**By Order of the Board**
*Sd/-*
**N. R. Ravikrishnan**
General Counsel, Chief Compliance Officer
and Company Secretary

Date : December 4, 2019
Place : Bengaluru

# आम्ही व्यसनमुक्तीचे दूत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा निर्धार

■ **मुंबई**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यसनमुक्तीच्या विचारांच्या प्रचारासाठी व्यसनमुक्ती पथनाट्य स्पर्धा शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी व संस्था संघटनांच्या उस्फुर्त सहभागाने पार पडली. व्यसनांच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रखर विरोधी मताचे होते. सरकारने व्यसनमुक्तीची कास धरावी याकरिता त्यांनी भारतीय संविधानात कलम ४७ च्या माध्यमातून खास तरतूद केली. व्यसनांना आळा घालणे तसेच व्यसनी व्यक्तींचे मतपरिवर्तन करुन त्यांना निर्व्यसनी बनविणे हे नशाबंदी मंडाळाचे उद्दिष्ट साध्य व्हावे आणि युवकांपुढे तसेच सर्वसामान्य समाजापुढे व्यसनमुक्तीचा संदेश जावा याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्यच्यावतीने व्यसनमुक्ती पथनाट्य स्पर्धा शिवाजी जोंधळे- जिल्हाधिकारी, मुंबई शहर व जितेंद्र भोपळे - यांच्या हस्ते उद्घाटन करुन सुरुवात करण्यात आली. यावेळी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन करित शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेमध्ये गुरुकुल महाविद्यालय, वालिया महाविद्यालय, डी. जी. रुपारेल महाविद्यालय, सिध्दार्थ महाविद्यालय आनंद भवन व बुध्द भवन, निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क चर्चगेट, रॉयल महाविद्यालय, ठाकूर महाविद्यालय, एस के सोमैय्या महाविद्यालय, ना. ग. आचार्य महाविद्यालय, किर्ती महाविद्यालय, दालमिया महाविद्यालय, राधव महाविद्यालय, एस.एस.टी महाविद्यालय, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापिठ, नांदेड, लक्ष्मण देवराम महाविद्यालय, जि. प. शाळा वसार, आंबरनाथ, जि. प. मराठी केंद्रशाळा, बोळींज, वसई, जिवनधारा संस्था, अभिनव कला मंच, युवा संस्था, ब्रम्हकुमारीज गावदेवी व विक्रोळी, युगंधरा वस्ती स्तर, ओरियन्टल महाविद्यालय, विद्यालंकार महाविद्यालय इ. नी सहभाग घेऊन व्यसनमुक्ती विषयांवर समस्यांचा उल्लेख कमी सांगत जास्तीत जास्त उपाययोजना मांडण्यावर भर दिला व त्याची अमलबजावणी करुन व्यसनमुक्तीसाठी प्रयत्नशिल राहण्याचा संदेश मुंबईकरांना दिला.

सदर स्पर्धेचे परिक्षण तात्या फेम बाळुमामाच्या नावानं चांगभलं मा. अक्षयजी टाक व अभिनेते पथनाट्य व दिग्दर्शक मा. संदेशजी लाळगे यांनी केले. सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक लक्ष्मण देवराम सोनावणे महाविद्यालय, कल्याण, व्दितीय क्रमांक डी. जी. रुपारेल महाविद्यालय, माटुंगा तृतीय क्रमांक निर्मला निकेतन कॉलेज ऑफ सोशल वर्क, चर्चगेट यांनी मिळवली. तर स्पर्धेत कै. कृष्णकांत साळेकर बुलंद आवाज पुरस्कार कु. आयुष रस्तोगी यांना देण्यात आला. स्पर्धेच्या शेवटी परिक्षकांनी पारितोषिक मिळालेल्या स्पर्धकांची नावे जाहीर केली व समारोप प्रसंगी परिक्षक मा. अक्षयजी टाक यांच्या हस्ते उपस्थितांना व्यसनमुक्तीची शपथ देण्यात आली.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा ०६ डिसेंबर २०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित भव्य पोस्टर्स प्रदर्शनी कार्यक्रमात शिवाजीपार्क येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असुन पारितोषिक मिळालेले स्पर्धक शिवाजीपार्क येथे सादरीकरण करुन व्यसनमुक्तीचा प्रचार करणार आहेत. तसेच वर्षभर ही पथनाट्ये संपुर्ण मुंबईत सादरीकरण करुन प्रचार, प्रसार करणार असल्याची माहिती मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विद्या विलास यांनी दिली.

# महापालिकेने पोलिसांचे थकवले २ कोटी ७० लाख

■ **वसई**

वसई-विरार शहर महापालिकेने पोलीस संरक्षणाची २ कोटी ६९ लाख रुपये थकविल्याचे उघड झाले आहे. पर्यावरण संवर्धन समितीतर्फे वसई तालुक्यातील पानथळ जमिनीवरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी आमरण उपोषण सुरूकेले आहे. या उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी महापालिकेचे थकबाकी उघड झाली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असतांनाही प्रशासन भुईगाव येथील सरकारी व पाणथळ जागेवर अतिक्रमण करून अनधिकृत कारभार करणाऱ्या भूमाफियांवर कारवाई करीत नसल्यामुळे समीर वर्तक, मेकॅन्झी डाबरे मॅक्सवेल रोझ यांनी तहसीलदार कचेरीसमोर २ डिसेंबरपासून आमरण उपोषणास सुरूकेले आहे. पर्यावरण संवर्धन समितीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या या आंदोलनाला २५ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली होती. तेव्हापासून अतिक्रमण दूर करण्यासाठी प्रशासनाने सात वेळा नोटिसा बजावल्या होत्या. मात्र त्यावर एकदाही कारवाई झाली नाही.

त्यामुळे समीर वर्तक यांनी अधिक माहिती घेतली असता, अतिक्रमणविरोधी कारवाईला पोलिस संरक्षण मिळत नसल्यामुळे ठप्प झाल्याची माहिती त्यांना मिळाली. वसई विरार शहर महानगरपालिकेने पोलीस खात्याचे जवळपास २



कोटी ६९ लाख रुपये अगोदरच्या बंदोबस्ताचे बिल थकीत आहे आणि जोपर्यंत हे बिल महानगरपालिका देत नाही तोपर्यंत पोलीस बंदोबस्त मिळणार नाही.अशी माहिती पोलीस अधीक्षक गौरव सिंग यांनी वर्तक यांना दिली.

त्यामुळे आंदोलकांनी आता नवीन मुद्दे उपस्थित केले आहेत. पाणथळ आणि कांदळवनातील जागेवरील अतिक्रमणे, हटविणे ही महसूल, महानगरपालिका आणि पोलीस यांची एकत्रित जबाबदारी असतांना महापालिकेच्या थकीत बिलाचा प्रश्न येतोच कसा ?

जर थकीत बिलाचा विषय पर्यावरण व कारवाई पेक्षा मोठा असेल तर, महापालिका हे बिल का देत नाही? आणि पोलीस वसूल का करीत नाही? महापालिकेकडे पोलिसांना देण्यासाठी पैसे नसतील तर महापौर मॅरेथॉन सारख्या महागड्या स्पर्धा का ठेवत आहे? मॅरेथॉनच्या माध्यमातून महापालिका निसर्ग समतोल पाळा आणि हरित वसई हा संदेश देत असेल तर पर्यावरणाचा अतिमहत्वाचा भाग असलेल्या पाणथळ जागा व कांदळवन वाचविण्यासाठी तसेच ही गिळंकृत करणाऱ्या भूमाफिया विरोधातील पर्यावरण संवर्धन समितीच्या आंदोलनाला महापालिका सहकार्य का करीत नाही?

जर पालघर पोलीस अनधिकृत अतिक्रमण करणाऱ्या भूमाफियांवर कारवाईसाठी थकीत बिलाचे कारण देऊन बंदोबस्त देणे टाळत असेल तर ८ डिसेंबरला होणाऱ्या महापौर मॅरेथॉनसाठी पोलीस बंदोबस्त नाकारणार का? असे नवे मुद्दे या आंदोलनात आता उपस्थित करण्यात आले आहेत.

# ठामपा आयुक्तांचा बंगला अनधिकृत

## वनजागेवर उभारला बंगला - एमआरटीपीच्या कारवाईची मागणी

■ **ठाणे**

ठाणे महानगरपालिका आयुक्तांचा बंगला पुन्हा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मंगळवारच्या महासभेत भाजप नगरसेवक मिलिंद पाटणकर यांनी बंगल्याच्या जागेच्या दस्तावेजावर वनजागेचा उल्लेख असल्याचा आरोप करून खळबळ उडवून दिली. तसेच, या आयुक्तांच्या बंगल्यात वारंवार अंतर्गत बदल केले असून नुकताच २० लाखाचा खर्च केल्याचेही म्हटले. त्यामुळे वनजागेवर अनधिकृतपणे बांधकाम करून बंगला उभारल्याप्रकरणी एमआरटीपीचा गुन्हा कुणावर



दाखल करणार असा सवालही सभागृहात उपस्थित केला. दरम्यान, सदरची जागा महापालिकेची असल्याचा खुलासा प्रशासनातर्फे करण्यात आला. तेव्हा, ठाण्याचे आयुक्त संजीव जयस्वाल असल्याने एकप्रकारे भाजपकडून आयुक्तांवर शरसंधान साधल्याचे बोलले जात आहे

मंगळवारच्या महासभेत भाजप नगरसेवक मिलिंद पाटणकर यांनी खळबळ उडवून दिली. पालिका आयुक्त राहत असलेला बंगला अधिकृत आहे कि, अनधिकृत तसेच बंगल्याचे प्लॅन मंजूर केलेले आहेत काय? असा सवाल उपस्थित केला. आयुक्तांचा बंगला हा सर्व्हिस रोडमधून जात असल्याचा दावा केला.पाटणकरांच्या प्रश्नावर प्रशासनाची बोलती बंद झाली. पाटणकरांच्या आरोपावर प्रशासनाच्यावतीने खुलाशात १९७४ साली याचठिकाणी बंगला होता. त्यानंतर तो पालिकेच्या नावावर झाला असल्याचे कार्यकारी अभियंता नितीन येसुगडे यांनी खुलासा केला. तसेच जुने बांधकाम असल्याने टॅक्स लावण्यात आला त्यामुळे हा बंगला अधिकृत असल्याचे येसुगडे यांनी सांगितले. यावर पाटणकर यांनी बंगल्याचे प्लॅन मंजूर नसल्याचा आरोप केला. तसेच जागा कशासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे याचा खुलासा करण्यात यावा, अशी मागणी सभागृहात केली. सदर जागेवर वनजागेचे आरक्षण असून आयुक्तांचा बंगला अनधिकृत असल्याचा दावा ठामपणे केला. त्याशिवाय बंगल्यात परवानगीशिवाय अंतर्गत बदल करण्यात आल्याचेही नमुद करताना या बदलासाठी २० लाखाचा खर्च ही करण्यात आल्याचे सांगून खळबळ उडवून दिली. मात्र प्रशासनाच्यावतीने अतिरिक्त आयुक्त समीर उन्हाळे यांनी बंगल्याबाबत खुलासा करताना ते बांधकाम जुने असून ३० ते ३५ वर्षे जुना हा बंगला आहे. तेव्हा तो अधिकृतच असल्याचा दावा अतिरिक्ति आयुक्त समीर उन्हाळे यांनी केला. तसेच, वनजमीन हे आरक्षण रद्द करण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आल्याची माहिती कार्यकारी अभियंता येसुगडे यांनी दिली.

# मीरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

■ **मुंबई**

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मीरा-भाईदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरुत्व वाहीनीचे डोंबवली विभागा अंतर्गत जलवाहीनीची तातडीची देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेतल्याने मिरा-भाईदर शहरास एम.आय.डी.सी. कडून होणारा पाणी पुरवठा गुरुवार दि.०५/१२/२०१९ रोजी मध्यरात्री १२.०० ते शुक्रवार दि.०६/१२/२०१९ रोजी मध्यरात्री १२.०० वाजेपर्यत (२४ तासाकरीता) बंद राहणार आहे. तसेच स्टेम कडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी एम.आय.डी.सी. प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मीरा-भाईदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा तसेच पुरेसा पाणीसाठा करून महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**

**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**

भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ, नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

**जाहीर नोटीस**

**दि सह्याद्री सहकारी बँक लि., मुंबई ... अर्जदार**

५/७ विजयवाडी, सह्याद्री भुवन,

३ रा माळा, चिरा बाजार, मुंबई ४०० ००२.

**अनुक्रमांक १ ते ३ ... जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दि. २०.१२.२०१९** रोजी **दुपारी १२.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणेः-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार - शेख हसमुद्दीन अब्दुल कादर | १ | १६.१०.१९ | ३५५९/१९ | २,०८,२७६/- | २०.१२.१९ |
| | जामीनदार - ताज महम्मद रुस्तमअली हाशमी | २ | | | | |
| | जामीनदार - मुदलीयार बाबू कन्नप्पा | ३ | | | | |
| २ | कर्जदार - परब प्रभाकर भिकाजी | १ | १६.१०.१९ | ३५६०/१९ | २,२९,५१८/- | २०.१२.१९ |
| | जामीनदार - दास अनिल गोविंद | २ | | | | |
| | जामीनदार - पालव रमेश गणपत | ३ | | | | |
| ३ | कर्जदार - मिश्रा मदनमोहन गयाप्रसाद | १ | १६.१०.१९ | ३५६१/१९ | १५,३८९/- | २०.१२.१९ |
| | जामीनदार - सणवर अली अकबर अली मिर्झा | २ | | | | |
| | जामीनदार - जाधव बाळू बापूराव | ३ | | | | |

ही नोटीस आज **दिनांक २९.११.२०१९** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-

शिक्का

**श्री. सुनिल बनसोडे**

उपनिबंधक, सहकारी संस्था

**मुंबई (परसेवा) दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि., मुंबई**

# शास्त्रीनगर हॉस्पिटलच्या शस्त्रक्रिया विभागाचे काम एक वर्षानंतर अखेर पूर्ण

■ **डोंबिवली**

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या डोंबिवली येथील शास्त्रीनगर रुग्णालयाच्या शस्त्रक्रिया विभागाचे काम गेले वर्षभर अत्यत संथगतीने सुरू होते. यामुळे वैद्यकीय अधिकारी नाराज होते. सहा महिन्यात काम पूर्ण करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते ते आता एक वर्षांनी पूर्ण झाले आहे. यामुळे डॉक्टरांनी समाधान व्यक्त केले.

शास्त्रीनगर रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम असेच रखडले होते याला प्रसिद्धी माध्यमांनी वाचा फोडली व मग प्रशासन खडबडून जागे झाले. त्यांनी रुग्णालयाच्या व्हरांडा व गळती रोखण्याचे दुरुस्तीचे काम सुरू केले. मात्र शस्त्रार्कि या विभागाचे काम खूप संथ चालू होते. ज्येष्ठ डॉक्टर अरविद प्रधान यांनी याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या वर्षी १ डिसेंबरला हा विभाग दुसऱ्या मजल्यावर हलवण्यात आला व तळ मजल्यावरील शस्त्राक्रिया विभागाचे काम सुरू करण्यात आले पण ठेकेदार हे काम खूप संथ पणे करत होता.

दुसऱ्या मजल्यावर तात्पुरते शत्राक्रिया गृह हलवण्यात आले असले तरी ते अपुरे पडत असल्याचे डॉ प्रधान म्हणाले डोंबिवली पूर्वचे सूतिकागृह गेले चार वर्षे धोकादायक इमारत म्हणून बंद करण्यात आले व टिळक रोडवरील घरडा धर्मदाय हॉस्पिटल बंद करण्यात आले. यामुळे सर्व ताण शास्त्रीनगर रुग्णालयावर पडत असल्याचे कर्मचारी सांगतात. या रुग्णालयात महिन्याला ३०० महिला प्रसूत होतात, पैकी सुमारे ८५ महिलांचे सिझेरियन ४० महिलांचे कुटुंब नियोजन ऑपरेशन करावे लागते याकडे लक्ष वेधण्यात आले. तळ मजल्यावरील शस्त्रक्रिया विभाग प्रशस्त असून गेले वर्षभर बंद असल्याने फारच गैरसोय होत असल्याचे सांगण्यात आले.

एक वर्षांनी का होईना शस्त्रक्रिया विभाग काम झाल्याने डॉक्टर, कर्मचारी यांनी सुटकेचा श्वास सोडला आहे. रुग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधिकारी डॉ चंद्रशेखर सावकारे यांना विचारले असता ते म्हणाले, आता हॉस्पिटलमध्ये अधिक काम होईल यासाठी ठोक वेतनावर डॉक्टर तातडीने नियुक्त करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

# ओबीसी असल्यानं पंकजा मुंडे यांचं खच्चीकरण; त्यांनी शिवसेनेत प्रवेश करावा

■ **बीड**

भाजपाच्या नेत्या आणि राज्याच्या माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या फेसबुक पोस्टवरून राजकीय वर्तुळ ढवळून निघाले. त्यानंतर स्वतः पंकजा मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना आपण एकनिष्ठ असून, पक्ष सोडणार नाही. जे काही बोलायचे ते १२ डिसेंबरला बोलेल, असं स्पष्ट केल्यानं सगळ्याच चर्चांवर पडदा पडला होता. मात्र, पूर्वाश्रमीचे भाजपाचे माजी आमदार आणि धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे यांनी पंकजा मुंडे यांचं भाजपात खच्चीकरण केलं जात असल्याचा दावा केला आहे.

परळी विधानसभा मतदारसंघातून पराभव झाल्यानंतर पंकजा मुंडे निराश झाल्या होत्या. त्यानंतर त्या फारशा सक्रिय दिसल्या नाही. अशातच काही दिवसांपूर्वी पंकजा मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील मेळाव्यासंदर्भात फेसबुकवर एक पोस्ट टाकली आणि त्यावरून अनेक चर्चा सुरू झाल्या. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, बबनराव लोणीकर, राम शिंदे या नेत्यांनी त्यांची भेट घेऊन पंकजा मुंडे पक्ष सोडणार नसल्याचं स्पष्ट केलं. खुद्द पंकजा मुंडे यांनीही फेसबुक पोस्टचा चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे. आपण पक्षाशी एकनिष्ठ असल्याचं त्या म्हणाल्या. त्यामुळे सगळ्या चर्चांना पूर्णविराम मिळाला होता.

त्यानंतर माजी आमदार आणि धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे यांनी भाजपावर गंभीर आरोप केले आहेत. भाजपानं कायम ओबीसी नेत्यांना संपविण्याचा प्रयत्न केला आहे. गोपीनाथ मुंडे यांनाही पक्षातून काढून टाकण्याचा ठरावही भाजपाने केला होता. मात्र, त्याला विरोध केल्यानं तो ठराव फेटाळण्यात आला. तोच प्रकाश पंकजा मुंडे यांच्यासोबत केला जात आहे. ओबीसी असल्यानं त्यांचही खच्चीकरण केलं जात आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांनी शिवसेनेत प्रवेश करावा, असा सल्ला शेंडगे यांनी दिला आहे. भाजपात पंकजा मुंडे यांचं खच्चीकरण केलं जात असल्याच्या शेंगडे यांच्या गौप्यस्फोटानंतर पुन्हा पंकजांचं नाव चर्चेत आलं आहे. मात्र, पंकजा मुंडे यांच्या मनात काय सुरू आहे. त्यांची काय भूमिका आहे. या सगळ्या उत्तरांसाठी सगळ्यांचं लक्ष गोपीनाथ गडावर होणाऱ्या मेळाव्याकडं लागलं आहे.

## पालिकेच्या अभय योजने प्रचंड प्रतिसाद

# मालमत्ताकर वसुलीचे उद्धिष्टपूर्ण करण्यासाठी मालमत्ता कर विभागाचे प्रयत्न

■ **नवी मुंबई**

नवी मुंबई शहरातील थकीत मालमत्ता कर धारकांना दिलासा देण्यासाठी महापालिकेने सुरू केलेल्या अभय योजना(अनमिस्ट) नवी मुंबईकर नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. अवघ्या दोन दिवसात सुमारे अडीच कोटी रक्कम पालिकेच्या तिजोरीत जमा झाली आहे.



अनेक वर्षा पासुन महापालिकेला मालमत्ता कर वसुलीत वार्षिक उद्दिष्ट गाठता आले नसल्याचे दिसून येते. मालमत्ता करआणि सेस वसुली विभागाच्या कामकाजाबाबत सर्वत्र चर्चा सुरू होती. मालमत्ता कर आणि सेस आकारणी विभागाची उपायुक्त म्हणुन जबाबदारी स्वीकारल्या नंतर अमोल यादव यांनी मालमत्ताकर विभागातील लिकेज शोधण्याचा प्रयत्न केला त्यातुन, त्यांना मालमत्ता करआकारणी करतांना सुरुवातीला राबविण्यातयेत असलेल्या पध्दत अनेक त्रुटी असल्याने, वर्षानुवर्षे पालिकेचा मालमत्ता कर नागरिकांकडे पडुन असल्याचे समोर आले. थकित मालमत्ता कर वर पालिका आकारणी करत असलेल्या दर मुळे अनेक वर्षे कोठ्यावधी मालमत्ता कर नागरिकांकडे थकीत आहे हे स्पष्ट झाल्याने, थकीत कर वसुलीकडे अमुल यादव यांनी प्रयत्न सुरूकेले आहेत.

मुळ मालमत्ता कराची रक्कम शंभर टक्के वसुलीसाठी मालमत्ता करविभागाने तकलीन आयुक्त रामस्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली व्याजाच्या रक्कमे सवलत देऊन मुळ मालमत्ता कराची रक्कम वसूल करता यावी म्हणून अभय योजना तयार करण्यात आली आहे. पालिकेच्या अभय योजनेला राज्य सरकारने मंजुरी दिल्यानंतर आयुक अण्णासाहेब मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली खाली एक डिसेंबर पासुन नवी मुंबईकरासाठी अभय योजना लागु करण्यातआलीआहे.ही संपुर्ण कर वसुली प्रणाली ऑनलाइन पध्दतीने असल्याने, नागरिकांना आपले कार्यालय आणि घरी बसून अभय योजनेचा फायदा घेता येईल त्यामुळे, नागरिकांना पालिकेच्या कार्यालया येण्याची आवश्यकता नाही.

पालिकेने एक डिसेंबर पासुन सुरू केलेल्या अभय योजनेचा लाभ नवी मुंबईकर मोठ्या प्रमाणातघेतअसल्याने दोन दिवसात अभययोजनेच्या माध्यमातून सुमारे दोन कोटी रुपये पेशा जास्त रक्कम वसूल करण्यातआली असल्याचे अमोल यादव यांनी सांगितले.

# अंधेरीत पेट्रोल पंपावरील कामगारांवर गोळीबार

■ **मुंबई**

अंधेरी चकाला येथील पेट्रोलपंपावर बुधवारी सकाळी दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी तरुणांनी गोळीबार केला. लुटीच्या उद्देशाने हे दोघे आले असावेत असा संशय व्यक्त करण्यात येत असून सुदैवाने या गोळीबारात कुणी जखमी झाले नाही.

चकाला येथील गुरुनानक पेट्रोलपंपावर बुधवारी पहाटे सुमारे चार वाजता दोन मास्क लावलेले तरुण दुचाकीवरून आले. त्यांनी येथील कर्मचाऱ्यांना बोलावले आणि कितीजण आहात असे विचारले. त्यावेळी कर्मचाऱ्याने तुम्हाला काय करायचे आहे आणि कोण आहेत तुम्ही? असे विचारताच दुचाकीवर मागे बसलेल्या तरुणाने स्वतकिडून बंदुकीतून कर्मचाऱ्यांच्या दिशेने गोळी झाडली. हे पाहून कर्मचाऱ्यांनी पेट्रोलपंपावरील कार्यालयात धाव घेतली. त्यावेळी बंदुकीतील गोळी येथील एका टेबलाला लागली. कर्मचाऱ्यांनी आरडाओरड केल्यामुळे मास्क घातलेले हे दोघे पळून गेले.

**सरस्वती कमर्शियल (इंडिया) लिमिटेड**

**नोंद. कार्यालयः** २०९/२१०, आर्काडिया इमारत, २ रा मजला, १९५, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१. दूरध्वनीः ४०१९८६००, फॅक्सः ४०१९८६५०, वेबसाईटः www.saraswaticommercial.com ईमेल आयडीः saraswati.investor@gcvl.in, सीआयएनः L51909MH1983PLC166605

**सूचना**

सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन २९ आणि ४७ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरूवार, दि. १२ डिसेंबर, २०१९ रोजी दु. २.०० वाजता, इतर बाबींसोबतच, ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि मंजूर करण्याकरिता घेण्यात येणार आहे.

यापुढे, १२ डिसेंबर, २०१९ रोजी संचालक मंडळाद्वारे मंजूर झालेले ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष घोषित झाल्यापासून ४८ तासांपर्यंत कंपनीच्या प्रतिभूतींमध्ये व्यवहार करण्याकरिता ट्रेडिंग विंडो ३० सप्टेंबर, २०१९ पासून कंपनीचे सर्व संचालक, नियुक्त व्यक्ती आणि त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्याकरिता बंद राहतील. हा पत्रव्यवहार कंपनीचे संचालक, नियुक्त व्यक्ती आणि त्यांचे जवळचे नातेवाईक यांना पाठविण्यात आला आहे.

ही माहिती कंपनीची वेबसाईट www.saraswaticommercial.com आणि बीएसई लि. ची वेबसाईट www.bseindia.com वर देखील उपलब्ध आहे.

**सरस्वती कमर्शियल (इंडिया) लिमिटेडकरिता**
सही/-
**अवनी संघवी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः ०४.१२.२०१९**

**विन्रो कमर्शियल (इंडिया) लिमिटेड**

**नोंद. कार्यालयः** २०९/२१०, आर्काडिया इमारत, २ रा मजला, १९५, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१. दूरध्वनीः ४०१९८६००, फॅक्सः ४०१९८६५०, वेबसाईटः www.winrocommercial.com ईमेल आयडीः winro.investor@gcvl.in, सीआयएनः L51226MH1983PLC165499

**सूचना**

सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन २९ आणि ४७ अन्वये याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक गुरूवार, दि. १२ डिसेंबर, २०१९ रोजी दु. ३.३० वाजता, इतर बाबींसोबतच, ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि मंजूर करण्याकरिता घेण्यात येणार आहे.

यापुढे, १२ डिसेंबर, २०१९ रोजी संचालक मंडळाद्वारे मंजूर झालेले ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि अर्ध वर्षाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष घोषित झाल्यापासून ४८ तासांपर्यंत कंपनीच्या प्रतिभूतींमध्ये व्यवहार करण्याकरिता ट्रेडिंग विंडो ३० सप्टेंबर, २०१९ पासून कंपनीचे सर्व संचालक, नियुक्त व्यक्ती आणि त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्याकरिता बंद राहतील. हा पत्रव्यवहार कंपनीचे संचालक, नियुक्त व्यक्ती आणि त्यांचे जवळचे नातेवाईक यांना पाठविण्यात आला आहे.

ही माहिती कंपनीची वेबसाईट **www.winrocommercial.com** आणि बीएसई लि. ची वेबसाईट **www.bseindia.com** वर देखील उपलब्ध आहे.

**विन्रो कमर्शियल (इंडिया) लिमिटेडकरिता**
सही/-
**उर्जा कारिया**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः ०४.१२.२०१९**